REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)

# "महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासामध्ये बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचे योगदान"

डॉ. करीम नबी मुल्ला
आर. आर. पाटील कॉलेज, सावळज, जि. सांगली.

**प्रस्तावना**



स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मुंबई इलाख्यात १८ संस्थाने होती. ही संस्थाने 'दक्षिणेकडील संस्थाने' अथवा 'डेक्कन स्टेटस्' म्हणून ओळखली जात होती. त्यापैकीच सातारा जिल्हयातील औंध हे एक संस्थान होते. २० व्या शतकातील औंध संस्थानाचे अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी पुरोगामी विचारांचे होते. संस्थानातील प्रजेच्या विकासासाठी त्यांनी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले. त्यांनी आपल्या संस्थानात लोकसत्ताक शासनपध्दतीचा स्वीकार करुन राजसत्तेच्या त्याग केला होता. लोकशाहीचा प्रयोग म्हणून तो भारतभर प्रसिध्द आहे. हा प्रयोग राबवून त्यांनी संपूर्ण भारतात एक नवा आदर्श निर्माण केला होता. अशाप्रकारची राज्यव्यवस्था स्वातंत्र्यपूर्व कालखंडात निर्माण करणारे ते एकमेव संस्थानिक होते.

औंध संस्थानात राजकीय सुधारणाबरोबरच आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक सुधारणांचाही मोठा टप्पा पार केला होता. बाळासाहेब पंतप्रतिनिधी कलाप्रिय, साहित्यिक प्रेमी होते. ते उत्तम चित्रकार होते. हजारो चित्रांचा संग्रह आजही औंधमध्ये पाहावयास मिळतो. त्यांनी अनेक नामवंत चित्रकारांना आश्रय दिला. अनेक विषयावर त्यांनी विपूल प्रमाणात लेखन केले आहे. व्याख्याने दिली आहेत. सन १९३५ मध्ये इंदूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या कालखंडात आपल्या भारतीय सांस्कृतिक वारशाचे संवर्धन केले. त्यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य ही भावी पिढीस प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या कार्यामुळे महाराष्टाच्या सांस्कृतिक विकासामध्ये मोठया प्रमाणावर भर पडली. त्यांचे हे कार्य महत्वपूर्ण आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिंबधामध्ये त्यांनी केलेल्या सांस्कृतिक विकासाचा समग्र आढावा घेतला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी ऐतिहासिक दृष्टीकोणातून विश्लेषणात्मक पध्दतीने केली आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घेतला आहे.

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी औंध संस्थानात लोकशाहीचा प्रयोग राबविला होता. राजकीय दृष्टीकोणातून त्याचे महत्व अनन्य साधारण आहे. ते लोकशाहीवादी दृष्टीकोणाचे असल्याचे दिसून येते. लोकशाहीच्या विकासासाठी सांस्कृतिक घटकांचा विकास ही तेवढाच महत्वाचा असतो. याची त्यांना उत्तम जाणीव असल्याचे दिसून येते. बाळासाहेब पंतप्रतिनिधी कला–विद्या, वाङ्‌मय, संगित–साहित्यप्रेमी व व्यासंगी होते. त्यांच्या कलाभिज्ञतेमुळे औंध संस्थानाची ख्याती सर्वदूर पसरली. सांस्कृतिक विकास प्रगल्भ लोकसत्ताक समाजाचे महत्वाचे वैशिष्टय आहे. स्वत: त्यांनी या क्षेत्रात नैपुण्य प्राप्त केलेच होते. शिवाय इतरांनाही यासाठी मोठया प्रमाणावर त्यांनी मदत केली होती.



Scanned with CamScanner

## चित्रकलेस उत्तेजन

बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे श्रेष्ठ दर्जाचे उत्तम चित्रकार होते. त्यांना चित्रकलेची समज विलक्षण होती. अनेक श्रेष्ठ चित्रकारांना सहवास त्यांना लाभला होता. स्वत: चित्रे काढण्याबरोबरच दुसऱ्यांच्या चित्रांचे रसग्रहण करण्याचे कौशल्य त्यांना प्राप्त होते. त्यांच्याकडे भारतीय पाश्चिमात्य चित्रशैलीचा मोठा संग्रह होता. आज ही तो औंधमधील श्री भवानी चित्रसंग्रहालयात पाहायला मिळतो. अनेक नामवंत चित्रकारांच्या कलाकृती त्यांनी जमविल्या होत्या. त्यांच्या या चित्रकलेच्या व्यासंगाबाबत ज्येष्ठ चित्रकार रा. ब. धुरंधर म्हणतात, "यांची चित्रे पौराणिक आणि ऐतिहासिक आहेत. त्यांच्या कलेमध्ये कोणत्याही पध्दतीचे अनुकरण नाही. यांची पध्दत ही स्वत:चीच आहे. म्हणून तिला 'औंध स्कूल' म्हणणे योग्य होईल." विचार अत्यंत मौलिक होते. चित्रकलेमुळे धार्मिक सद्भावना, राष्ट्रकल्याण, समाजप्रबोधन, समाजजागृतीची भावना वाढली पाहिजे, तसेच आपणास त्यापासून आनंद ही प्राप्त झाला पाहिजे. भारतीय चित्रकलेच्या समृध्द वारश्याला त्यांनी नवसंजिवनी प्राप्त करुन दिली. तत्कालीन अनेक चित्रकारांना राजाश्रय देवून मदत केली. चित्ररामायण, अजिंठा, श्री शिवाजी अल्बम, महाभारत आदी सचित्र अल्बमही त्यांनी प्रकाशित केले. रा. ब. धुरंधर, बाबुराव पेंटर, हळदणकर, आदी नामवंत चित्रकारांना सातत्याने ते औंधला बोलावित. बरमाप्पा कोटयाळ, पंडित सातवळेकर, केशव देशपांडे आदी उत्तम चित्रकार—शिल्पकार औंधमध्ये मुक्कामी होते. चित्रकला व शिल्पकलेचा व्यासंग जपण्यासाठी त्यांनी औंधमध्ये स्वतंत्र इमारत बांधली.

## शिल्पकलेस प्रात्सोहन

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी अनेक प्रसिध्द शिल्पकार, चित्रकार, कुंभार, बुरुड वगैरेंना राजाश्रय दिला होता. दादोबा पाथरवट हे त्यापैकी एक नामवंत मूर्तीकार होते. कोरीव मूर्ती, पुतळे, हस्तीदंताचे कुशल कार्य येथे चालत. त्याकाळात औंधमधील शिल्प, मुर्तींना मोठी मागणी असे. प्राचीन भारतीय संस्कृतीच्या प्रेमापोटी त्यांनी १९३६ मध्ये श्री भवानी वस्तूचित्र संग्रहालयाची स्थापना केली. यामध्ये प्रामुख्याने प्राचीन भारतीय चित्रकला, जयपूर शैली—कांगडा शैली, गढवाल, पंजाब, मोगल तसेच महाराष्ट्र मोगल काळातील उर्दू हस्तलिखिते, मराठा व पेशवा काळातील सचित्र पोथ्या, जुन्या संस्कृत ग्रंथाचा समावेश दिसून येतो. तसेच आबालाल रहिमान, बाबूराव पेंटर, रा. ब. धुरंधर, हळदणकर आदी श्रेष्ठ चित्रकारांच्या कलाकृतीचे जतन त्यांनी केले आहे. याशिवाय अॅंद्रेला डेलसार्टो, मायकेल अँजेलो, लिआनार्दो—दा—व्हिन्सी, मुरिल्लो, रेम्ब्रॉंट, गोया, व्हानयडीक आदी प्रसिध्द चित्रकारांच्या कलाकृतीही याठिकाणी आहेत. स्वत: बाळासाहेबांनी रेखाटलेली हजारो चित्रेही इथे दिसून येतात.

बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी यांनी भावी पिढीस दिलेला हा सांस्कृतिक कला—शिल्पांचा वारसा अतिशय महत्वाचा असल्याने संस्थानच्या विलीनीकरणानंतर श्री भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, पुराभिलेख/पुरातत्व विभाग महाराष्ट्र शासन यांच्या नियंत्रणाखाली आहे. हजारो पर्यटक, विद्यार्थ्यांच्या सहली, जगभरातील हौशी पर्यटक—चित्रकार, आदि लोक मोठया प्रमाणावर या संग्रहालयास भेट देत असतात. वस्तूसंग्रहालयाचे महत्व मानवी इतिहासात महत्वाचे असते, याची जाणीव बाळासाहेबांना असल्याचे दिसून येते. इतिहासाचा अभ्यास केवळ कागदपत्रांच्या साहाय्यानेच अभ्यासता येतो असे नसून तो इमारती, नाणी, शिलालेख, हत्यारे व विविध पुरातन वस्तूद्वारेही इतिहासाची ओळख होते. संग्रहालये ही राष्ट्राच्या सांस्कृतिक प्रगतीचा आलेख म्हणून महत्वाची असतात. त्यातून राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागते. सामाजिक प्रगतीचे विविध काळातील टप्पे संग्रहालयातून समजुत घेता येतात.

## संगित—नाटय, किर्तन—शाहीरी या परंपरागत कलांना प्रोत्साहन

बाळासाहेब पंतप्रतिनिधी अनेक पारंपारिक कलांना प्रोत्साहन दिले. संगीत, नाटय, किर्तन, शाहीरी, लोकगीते आदी पारंपारिक कलांचे ते चाहते होते. ते स्वत: उत्कृष्ट किर्तनकार होते. ते प्रतिवर्षी शिवजयंती व वडिलांच्या पुण्यतिथीला किर्तन करीत असत. त्यांनी किर्तनावर अनेक पुस्तके छापली होती. "किर्तनसुमनहार" त्यापैकीच एक होते. किर्तन समाज प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम आहे, याची जाणीव त्यांना होती. एवढेच नव्हे तर महिलांनाही किर्तने करावीत अशी अत्यंत पुरोगामी भूमिका त्यांनी वाई



Scanned with CamScanner

येथिल किर्तन संमेलनात मांडली होती. मुंबई येथील किर्तनकारांच्या परिषदेचे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले होते.

संगीत नाटय प्रेमामुळे त्यांनी सन १९४० पासून औंध येथे शिवानंद स्वामींच्या स्मृतीप्रित्यर्थ संगीत महोत्सव सुरु केला. हा महोत्सव औंध संगित महोत्सव म्हणून ओळखला जातो. या महोत्सवात संगीत क्षेत्रातील अनेक ख्यातनाम गायक, वादक उपस्थित राहतात. सन १९९० मध्ये या महोत्सवाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे झाले. आजही प्रतिवर्षी हा महोत्सव साजरा केला जातो. गायनाचार्य अनंत मनोहर जोशी यांसारखे गायक औंध दरबारी होते. त्यांनी आश्रय दिला होता. वस्तुसंग्रहाप्रमाणेच बाळासाहेब उत्तम लोकसंग्रहाक होते. म्हणूनच औंधमध्ये वेदभूषण पंडित सातवळेकर साहित्यिक व न्यायमूर्ती ना. गो. चापेकर, व्हायोलीयन वादक गजानन जोशी, गीतरामायणकार ग. दि. माडगूळकर अशी नररत्ने बाळासाहेबांच्या कोंदणात चमकत होती.

## साहित्यिक ज्ञानसोहळा

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी औंधमध्ये अनेक साहित्यिक, सांस्कृतिक नव्या परंपरा निर्माण केल्या. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील ख्यातनाम, प्रसिध्द इतिहासकार, साहित्यिक, कवी, लेखक यांना ते औंधमध्ये बोलावत व त्यांची व्याख्याने भरवून लोकांचे प्रबोधन करत असत. प्रसिध्द इतिहासकार जदूनाथ सरकार, वि.का. राजवाडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, शिव अभ्यासक बाबासाहेब देशपांडे, आचार्य श. द. जावडेकर, रावसोहब पटवर्धन, भाऊ व नाना धर्माधिकारी, शंकरराव देव, आचार्य भागवत, दत्तो वामन पोतदार, सिध्देश्वरशास्त्री चित्राव, गानहिरा हिराबाई बडोदेकर आदी असंख्य ख्यातनाम नावांचा उल्लेख करता येईल. की ज्यांनी औंधमध्ये येऊन आपल्या ज्ञानाचा, माहितीचा अविष्कार, व्याख्याने, परिषदा, शिबिर आदि माध्यमातून औंधवासीयांना बाळासाहेबांनी मिळवून दिला.

बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी महाभारताच्या संशोधित नव्या आवृत्तीसाठी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेस त्या काळात एक लाख रुपयांची देणगी देवून आपल्या औदार्याचा उच्चांक गाठला. यामुळे प्राचीन भारतीय राजकीय, ऐतिहासिक, समृध्द वारशाचा उध्दार करण्यास हातभार लावला. बाळासाहेबांनी अनेक सांस्कृतिक, साहित्यीक, सामाजिक संस्थांना मदत केली. अशाप्रकारे आपले संस्थान सर्वच क्षेत्रात अग्रेसर रहावे. यासाठी स्वत: झटणारे, स्वत:च्या अंगभूत गुणवैशिष्टयाने त्यामध्ये भर घालणारे व इतरानांही त्यासाठी सतत प्रेरणा देणारे एक कृतीशील नेतृत्व त्यांनी केले. विद्या–कला, वाङ्‌मय, क्रिडा अशा विविध सांस्कृतिक क्षेत्रात ते स्वत: मान्यवर झालेच, मात्र संस्थान व संस्थानाबाहेरील अनेक जणांना आधार दिला. त्यामुळे औंध परिसरात मोठया प्रमाणाात सांस्कृतिक विकास झाला.

औंध संस्थानात महात्मा गांधीच्या विचारांचा प्रभाव असणारी राज्यघटना निर्माण करुन ती राबविली त्यास लोकशाहीचा प्रयोग म्हणतात. या राजकीय सुधारणाबरोबरच काही मानवतावादी प्रयोगही राबविले. आटपाडी जवळील स्वतंत्रपूर येथे 'मुक्तकैदी वसाहतीचा' प्रयोग राबविला. यावर आधारित –दो आँखे बारह हाथ' हा जगप्रसिध्द चित्रपट याच संस्थानातील वरील सत्यघटनेवर आधारित होता. यामुळे महाराष्ट्र व भारताचे सांस्कृतिक विश्व समृध्द झाले.

## समारोप

एक लहानशा संस्थानाचा राज्यप्रमुख एवढया मोठया प्रमाणात सांस्कृतिक साहित्यिक क्षेत्रात कार्य करु शकतो, ते कार्य नव्या पिढीसाठी, समाजासाठी तसेच आजच्या राज्यकर्त्यासाठी ही दिशादर्शक, मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी सांस्कृतिक–साहित्यिक क्षेत्रात केलेल्या कामगिरीमुळे औंध संस्थान व आजच्या सातारा–सांगली परिसरात अनेक साहित्यिक, चित्रकार, संगीतकार निर्माण झाले. सांस्कृतिक–साहित्यिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, साने गुरुजी, शाहिर शंकरराव निकम, मुंकूदराव किर्लोस्कर आदी व्यक्तींचे शिक्षण औंधमध्येच झालेले होते. बाळासाहेबांचे उदात्त संस्कार यासाठी कारणीभूत आहेत असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. भवानी वस्तुसंग्रहालयासारखे संग्रहालय ग्रामीण महाराष्ट्रात अन्यत्र कोठेही



Scanned with CamScanner

नाही. देश—परदेशातून हजारो पर्यटक, हौसी चित्रकार त्यास भेट देतात. त्यांचे हे योगदान भावी पिढीस व आधुनिक महाराष्ट्राच्या साहित्यिक—सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासासाठी महत्वपूर्ण आहे.

## संदर्भसूची

१. चित्राव सिध्देश्वरशास्त्री (संपा) 'भारतवर्षीय अर्वाचीन चरित्र कोश' पुणे १९४०.
२. किर्लोस्कर जीवन—स्मृती ग्रंथ बाळासाहेब पंतप्रतिनिधी स्मारक समिती — १९६८.
३. गोखले पु.पा., स्मृतीग्रंथ — बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांची वाङ्:मयीन पूजा.
४. पंत अप्पा, 'मुलखावेगळा राजा' मान—सन्मान प्रकाशन, पुणे.
५. गॅझेटिअर सातारा जिल्हा महाराष्ट्र राज्य.
६. माडगुळकर ग. दि.— 'मतंरलेले दिवस'.
७. पंत भवानराव — आत्मचरित्र खंड— १ व २, १९४६.
८. खांडेकर राजीव— 'दो आँखे' चा सुवर्णक्षण लोकसत्ता, दिवाळी अंक, २००६.
९. गगरानी कविता — खुले करागृह ते दो आँखे बारह हाथ' शोधनिंबध संग्रह, शिवाजी विद्यापीठ, इतिहास परिषद—२००८.
१०. Tupe B. U. Socio –Economic History of Aundh (Ph. D. 2000), Shivaji University, Kolhapur.



Scanned with CamScanner